ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 30 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## “अमित शाह दोषी तरी आहेत किंवा अकार्यक्षम” - राहुल गांधी





पान 3 वरुन...

राष्ट्रवादीमध्ये स्वीकृत नगरसेवक पदासाठी ‘लॉबिंग’

### एक संशयित आरोपी जमावाच्या मारहाणीत मृत्यूमुखी

# लोकसभेत परीक्षा सुधारणा विधेयक मंजूर!

**महाईन्यूज । कोलकाता**

**देशातील सार्वजनिक परीक्षा अधिक पारदर्शक आणि पेपरफुटीसारख्या गैरप्रकारांवर कठोर लगाम घालण्यासाठी केंद्र सरकारने आणलेले परीक्षा सुधारणा विधेयक लोकसभेत विरोधकांच्या गदारोळात आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणानंतर हे विधेयक चर्चेत आले होते. दोन दिवसांच्या चर्चेनंतर अखेर सरकारने ते मंजूर करून घेतले.**



देशातील सार्वजनिक परीक्षा अधिक पारदर्शक आणि पेपरफुटीसारख्या गैरप्रकारांवर कठोर लगाम घालण्यासाठी केंद्र सरकारने आणलेले परीक्षा सुधारणा विधेयक लोकसभेत विरोधकांच्या गदारोळात आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणानंतर हे विधेयक चर्चेत आले होते. दोन दिवसांच्या चर्चेनंतर अखेर सरकारने ते मंजूर करून घेतले.

या विधेयकानुसार परीक्षा गैरव्यवहार करणाऱ्यांवर अधिक कठोर शिक्षा करण्यात आली आहे. विद्यमान कायद्यातील तीन ते पाच वर्षांच्या शिक्षेऐवजी आता कमाल १० वर्षांपर्यंत कारावास आणि ₹५० लाखांपर्यंत दंड ठोठावण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच परीक्षा प्रक्रियेशी संबंधित सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांकडून गैरव्यवहार झाल्यास त्यांच्यावर ₹५ कोटींपर्यंत दंड आकारला जाईल.

याशिवाय, पेपरफुटी करणाऱ्या संघटित टोळ्यांवर अधिक कठोर कारवाई करण्यासाठी ₹१० कोटींपर्यंत दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. पेपरफुटीची सर्व प्रकरणे फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवली जातील. तपास दोन महिन्यांत पूर्ण करून पुढील तीन महिन्यांत निकाल देण्याचे उद्दिष्ट या कायद्यात ठेवण्यात आले आहे.

या कायद्याच्या कक्षेत नीट-यूजी (NEET-UG), जेईई (MAIN), यूजीसी-नेट (UGC-NET), सीयूईटी (CUET), यूपीएससी (UPSC), कर्मचारी निवड आयोग (SSC), रेल्वे भरती मंडळ (RRB), आयबीपीएस (IBPS) तसेच केंद्र सरकारच्या विविध भरती परीक्षा येणार आहेत.

लोकसभेत केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी विधेयक मांडताना विरोधकांवर राजकारण केल्याचा आरोप केला. या महत्त्वाच्या विधेयकावर विधायक सूचना करण्याऐवजी विरोधकांनी असंसदीय भाषा वापरल्याची टीका त्यांनी केली. तसेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या काही विधानांवरही त्यांनी आक्षेप नोंदविला.

### कोणत्या परीक्षा या कायद्याच्या कक्षेत येतात?

सरकारच्या विविध सार्वजनिक परीक्षा आणि भरती परीक्षा या कायद्याच्या कक्षेत येतात. त्यामध्ये नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) मार्फत घेतल्या जाणाऱ्या नीट-यूजी (NEET-UG), जेईई (MAIN), यूजीसी-नेट (UGC-NET) आणि सीयूईटी (CUET) या परीक्षांचा समावेश आहे. याशिवाय यूपीएससी (UPSC), कर्मचारी निवड आयोग (SSC), रेल्वे भरती मंडळ (RAILWAY RECRUITMENT BOARDS), आयबीपीएस (IBPS) तसेच केंद्र सरकारच्या विविध भरती परीक्षा या कक्षेत येतात.

### राहुल गांधींच्या विधानावर निशाणा



सिंह पुढे म्हणाले, विरोधी पक्षनेत्याने देशातील तरुणांना मूर्ख म्हणणे, अत्यंत दुर्दैवी आहे. ते म्हणाले, "देशाचे भविष्य असलेल्या या तरुणांना 'मूर्ख' म्हणण्यापेक्षा अधिक दुर्दैवी काय असू शकते? मला आश्चर्य वाटते की, त्यांना संसदीय कामकाजाचे मूलभूत नियम आणि शिष्टाचार तरी माहीत आहेत की नाही?" असा सवालही त्यांनी केला.

### "या महत्त्वाच्या विधेयकावर विरोधकांचे राजकारण"

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत हे विधेयक मांडले. दरम्यान त्यांनी विरोधकांच्या भूमिकेवर आक्षेप घेत, थेट हल्ला चढवला. ते म्हणाले, "विरोधी पक्षाचे वर्तन अत्यंत निराशाजनक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वचनबद्धता दर्शवणाऱ्या, अशा या गंभीर आणि महत्त्वाच्या विधेयकावर विधायक सूचना देण्याऐवजी, विरोधी पक्ष केवळ राजकारण करत आहे. विरोधी पक्षनेत्यांनी वापरलेली भाषा अत्यंत असंसदीय आहे. ती भाषा एवढी अयोग्य होती की, मी तिचा पुन्हा उल्लेखही करू इच्छित नाही. जे कोणी स्वतःला सुशिक्षित आणि संसदीय संकेतांचे जानकार समजतात, त्यांना हे माहित असायला हवे की, सभागृहात अशी भाषा वापरली जाऊ शकत नाही.




### विधेयकातील महत्त्वाच्या तरतुदी

- पेपरफुटी व गैरव्यवहारासाठी १० वर्षांपर्यंत कारावास.
- दोषींवर ₹५० लाखांपर्यंत दंड.
- सेवा पुरवठादार कंपन्यांवर ₹५ कोटींपर्यंत दंड.
- संघटित पेपरफुटी रॅकेटवर ₹१० कोटींपर्यंत दंड.
- सर्व प्रकरणांची फास्ट ट्रॅक न्यायालयात सुनावणी; सुमारे पाच महिन्यांत न्यायप्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट.
- NEET, JEE, UGC-NET, CUET, UPSC, SSC, RRB, IBPSसह केंद्र सरकारच्या विविध परीक्षा कायद्याच्या कक्षेत.

# गणेश मंडळे आणि मंदिर ट्रस्टसाठी 'SAMAVET'चे डिजिटल समाधान

## पारदर्शक देणगी व्यवस्थापन, तत्काळ ई-पावती आणि पर्यावरणपूरक 'पेपरलेस' प्रणाली

**महाईन्यूज । पुणे**

**देशभरातील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वेगाने वाढत असताना, देणगी व्यवस्थापन अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि सुलभ करण्याच्या उद्देशाने SAMAVET – INDIA'S COMMUNITY TECHNOLOGY PLATFORM ने विकसित केलेली EPAWATI (डिजिटल देणगी पावती) प्रणाली गणेश मंडळे, मंदिरे, धार्मिक संस्था, सार्वजनिक ट्रस्ट आणि स्वयंसेवी संस्थांसाठी आधुनिक व विश्वासार्ह पर्याय म्हणून पुढे येत आहे.**

गणेशोत्सव, यात्रा, जत्रा, धार्मिक उत्सव तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर देणग्या स्वीकारल्या जातात. मात्र, पारंपरिक पद्धतीने देणगीची नोंद करताना कागदी पावत्या लिहिणे, पावती पुस्तके सांभाळणे, नोंदी जतन करणे, जुन्या पावत्या शोधणे आणि आर्थिक व्यवहारांचा हिशोब ठेवणे ही प्रक्रिया वेळखाऊ व खर्चिक ठरते. अनेकदा पावती पुस्तके हरवणे, नोंदी अपूर्ण राहणे किंवा आवश्यक वेळी माहिती उपलब्ध न होणे यासारख्या अडचणी संस्थांसमोर निर्माण होतात.

या पार्श्वभूमीवर SAMAVET ने विकसित केलेली EPAWATI प्रणाली पारंपरिक देणगी व्यवस्थापनाला डिजिटल आणि आधुनिक पर्याय उपलब्ध करून देत आहे. या प्रणालीमध्ये संबंधित संस्थेचा कार्यकर्ता देणगीदाराचे नाव, मोबाईल क्रमांक आणि देणगीची माहिती डिजिटल स्वरूपात नोंदवतो. माहिती नोंदवल्यानंतर काही सेकंदांतच देणगीदाराला संबंधित संस्थेच्या अधिकृत नावाने WHATSAPP वर डिजिटल पावती आणि आभार संदेश प्राप्त होतो.




SAMAVET प्लॅटफॉर्म केवळ देणगी व्यवस्थापनापुरता मर्यादित नसून, संस्थांच्या विविध उपक्रमांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाधारित सेवा उपलब्ध करून देत आहे. यामध्ये EVENT INTELLIGENCE, 24×7 FACEBOOK आणि YOUTUBE LIVE STREAMING, तसेच PODCAST आणि MEDIA PRODUCTION यांसारख्या सेवांचाही समावेश आहे.

गणेशोत्सव, यात्रा, धार्मिक उत्सव आणि विविध सार्वजनिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर अनेक संस्था आता डिजिटल व्यवस्थापनाचा स्वीकार करत आहेत. पारदर्शकता, तत्काळ डिजिटल पावती, सुरक्षित नोंदी, सुलभ अहवाल आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा एकत्रित वापर या वैशिष्ट्यांमुळे SAMAVET ची EPAWATI प्रणाली गणेश मंडळे, मंदिर ट्रस्ट आणि सामाजिक संस्थांसाठी डिजिटल परिवर्तनाची नवी दिशा ठरत असल्याचे चित्र आहे.

### केवळ डिजिटल पावती नव्हे.. बरंच काही..!

SAMAVET ची EPAWATI प्रणाली केवळ डिजिटल पावती तयार करण्यापुरती मर्यादित नाही. या प्लॅटफॉर्मद्वारे संस्थांना देणगी व्यवस्थापन, सुरक्षित डिजिटल रेकॉर्ड, शोधण्यायोग्य नोंदी, विविध प्रकारचे अहवाल आणि व्यवस्थापनासाठी आवश्यक माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना देणगीची माहिती तपासणे, नोंदी शोधणे आणि आवश्यक अहवाल तयार करणे अधिक सुलभ होते.

### पर्यावरणपूरक 'पेपरलेस व्यवस्थापन'


डिजिटल व्यवस्थापनामुळे संस्थांचे प्रशासकीय कामकाज अधिक वेगवान, अचूक आणि सुटसुटीत होण्यास मदत होत आहे. विशेषतः मोठ्या गणेश मंडळांना, मंदिर ट्रस्टना आणि विविध सामाजिक संस्थांना मोठ्या प्रमाणातील देणगी नोंदी व्यवस्थित ठेवण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरू शकते. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही EPAWATI प्रणाली महत्त्वाची ठरत आहे. डिजिटल पावत्यांचा वापर वाढल्यामुळे कागदाचा वापर कमी होण्यास मदत होते. पावती पुस्तके छापण्याचा खर्च वाचतो, कागदी नोंदींचे जतन करण्याची गरज कमी होते आणि 'पेपरलेस व्यवस्थापन' या संकल्पनेला चालना मिळते. त्यामुळे संस्था डिजिटल परिवर्तनासोबतच पर्यावरणपूरक उपक्रमातही आपले योगदान देऊ शकतात.

---

# अनैतिक संबंधाच्या संशयातून मित्राचा खून; रूममेटसह पत्नीला अटक

**महाईन्यूज । पुणे**

**शिक्रापूर (ता. शिरूर) येथील करंजेनगर परिसरातील मोकळ्या मैदानात झुडपांमध्ये पोत्यात सापडलेल्या अज्ञात तरुणाच्या खुनाचा उलगडा शिक्रापूर पोलिसांनी अवघ्या काही तासांत केला. अनैतिक संबंधाच्या संशयातून रूममेटनेच मित्राचा गळा दाबून खून केल्याचे तपासात समोर आले असून, मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी आरोपीच्या पत्नीनेही मदत केल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.**



मृताची ओळख गौरव ऊर्फ अक्षय अशोक वायकर (वय २४, मूळ रा. थेऊर, ता. हवेली) अशी झाली. २६ जुलै रोजी करंजेनगर येथील झुडपात पोत्यात भरलेला त्याचा मृतदेह आढळून आला होता. मृताची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी सोशल मीडियाचा वापर करत गुप्त माहितीदारांचे जाळे सक्रिय केले. त्यानंतर गौरव हा करंजेनगर येथे मुकेश विठ्ठल सोनवणे (वय १९) व त्याची पत्नी जान्हवी अनिल पाटोळे (वय १९) यांच्यासोबत राहत असल्याचे समोर आले.

तपासादरम्यान गेल्या दोन दिवसांपासून त्यांच्यात वाद सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यावेळी अनैतिक संबंधाच्या संशयातून मुकेशने गौरवचा गळा दाबून खून केला आणि मृतदेह पोत्यात भरून निर्जन ठिकाणी टाकण्यासाठी जान्हवीने मदत केल्याची कबुली दिली.

या प्रकरणी मयताची आई कांचन अशोक वायकर यांच्या फिर्यादीवरून शिक्रापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास शिक्रापूर पोलिस करीत आहेत.

### संशयातून घडला निर्घृण खून

पोलिस तपासात धक्कादायक बाब समोर आली. रूममेट असलेल्या गौरव वायकरवर पत्नीशी अनैतिक संबंध असल्याचा संशय आरोपी मुकेश सोनवणेला होता. याच संशयातून दोघांमध्ये वारंवार वाद होत होते. अखेर संतापाच्या भरात मुकेशने गौरवचा गळा दाबून खून केला. त्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने पत्नीच्या मदतीने मृतदेह पोत्यात भरून करंजेनगर येथील झुडपात टाकल्याचे तपासात निष्पन्न झाले.

### सोशल मीडियामुळे मृताची ओळख पटली


करंजेनगर येथील झुडपात पोत्यात मृतदेह सापडल्यानंतर मृताची ओळख पटविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. शिक्रापूर पोलिसांनी तातडीने सोशल मीडियावर मृताचे छायाचित्र प्रसारित केले आणि गुप्त बातमीदारांचे जाळे सक्रिय केले. त्यातून मृताची ओळख गौरव ऊर्फ अक्षय अशोक वायकर अशी पटली. त्यानंतर अवघ्या काही तासांत पोलिसांनी आरोपींचा शोध घेऊन खुनाचे गूढ उलगडले.

# राष्ट्रवादीमध्ये स्वीकृत नगरसेवक पदासाठी 'लॉबिंग'

## अजित गव्हाणे यांची एन्ट्री होणार? नव्या राजकीय समीकरणांवर पार्थ पवार यांचा निर्णय निर्णायक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीवरून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भाजपला प्रभावी आव्हान देण्यासाठी स्वीकृत नगरसेवकांच्या प्रस्तावित यादीत मोठे बदल करण्याची तयारी पक्षात सुरू असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. विशेष म्हणजे, माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असून, त्यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून 'एन्ट्री' होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**




ऑक्टोबर २०२६ मध्ये स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे. महापालिकेत सत्ताधारी भाजपला सात, तर राष्ट्रवादी काँग्रेसला तीन स्वीकृत नगरसेवक नियुक्त करण्याची संधी मिळणार आहे. यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसने माजी नगरसेविका सीमा सावळे, माजी नगरसेवक राजेंद्र जगताप आणि पक्षाचे प्रवक्ते फझल शेख यांची नावे निश्चित केली होती. मात्र, हा प्रस्ताव मंजूर न झाल्याने आता नव्याने स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती होणार आहे.

त्यामुळे इच्छुकांकडून पक्षश्रेष्ठींकडे 'लॉबिंग' सुरू झाल्याचे बोलले जात आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेत भाजपला अधिक प्रभावीपणे आव्हान देऊ शकतील, असे आक्रमक, अभ्यासू आणि जनाधार असलेल्या चेहऱ्यांना संधी देण्याबाबत पक्षांतर्गत सकारात्मक चर्चा सुरू आहे.

राजकीय वर्तुळात माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांच्या नावाची जोरदार चर्चा होत असली, तरी त्यांनी अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही. स्वीकृत नगरसेवक पदासाठी ते इच्छुक आहेत की नाहीत, पक्षश्रेष्ठींच्या निर्णयानंतरच ते भूमिका मांडणार आहेत, की त्यांच्यासाठी पक्षामध्ये अन्य कोणती राजकीय जबाबदारी निश्चित केली जात आहे, याबाबत अद्यापही साशंकता कायम आहे. त्यामुळे त्यांच्या भूमिकेबाबत विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. आज पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात भाजपचे वर्चस्व असताना सक्षम आणि आक्रमक विरोधी पक्षाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेससमोरही नवे नेतृत्व पुढे आणण्याचे मोठे आव्हान आहे. पक्षनिष्ठा, जनाधार, अभ्यास आणि सभागृहात प्रभावी भूमिका मांडण्याची क्षमता या निकषांवर निर्णय होणे अपेक्षित आहे.

माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांच्या नावाची चर्चा होत असली, तरी त्यांची नेमकी भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे त्यांच्या संभाव्य 'एन्ट्री'बाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये तथ्य किती आणि राजकीय अंदाज किती, हे येणारा काळच स्पष्ट करेल. त्याचबरोबर पूर्वी निश्चित करण्यात आलेल्या नावांवर पक्ष ठाम राहणार की राजकीय समीकरणे लक्षात घेऊन नव्या चेहऱ्यांना संधी देणार, हेदेखील महत्त्वाचे ठरणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खासदार पार्थ पवार स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीबाबत नेमका कोणता निर्णय घेणार? पक्षातील जुन्या चेहऱ्यांवर विश्वास दाखविणार की भाजपला प्रभावी आव्हान देण्यासाठी नव्या, आक्रमक आणि अभ्यासू नेतृत्वाला संधी देणार? याकडे आता पिंपरी-चिंचवडच्या संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### दोन मतप्रवाह; बदलाची मागणी

स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीवरून राष्ट्रवादीत दोन मतप्रवाह असल्याचे समोर येत आहे. पूर्वी निश्चित करण्यात आलेल्या नावांनाच संधी द्यावी, अशी भूमिका एका गटाची आहे. तर बदललेल्या राजकीय परिस्थितीनुसार नव्या आणि प्रभावी चेहऱ्यांना संधी देऊन भाजपाविरोधातील लढाई अधिक मजबूत करावी, अशी भूमिका दुसऱ्या गटाकडून मांडली जात आहे.

# कोयतेधारींचा मोकाट वावर; चिखलीकरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिखली प्राधिकरण परिसरातील सेक्टर ११, १२ आणि १३ मधील विविध सोसायट्यांमध्ये मागील आठ दिवसांपासून चार ते पाच अज्ञात व्यक्ती हातात कोयते घेऊन फिरत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या व्यक्तींची हालचाल अनेक सोसायट्यांच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्येही कैद झाली असून, त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी पिंपरी-चिंचवडचे पोलीस अधीक्षक यांना निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी केली आहे.**




निवेदनात सांगितले आहे की, चिखली प्राधिकरणातील सेक्टर ११, १२ आणि १३ या भागात काही अज्ञात व्यक्ती दिवस-रात्र संशयास्पदरीत्या फिरत असून त्यांच्या हातात कोयते असल्याने नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, या भागात गेल्या दहा ते बारा दिवसांत चोरीच्या घटनाही घडल्या असल्याने नागरिकांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

सोसायट्यांच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये संबंधित संशयित स्पष्टपणे दिसत असल्याचा दावा करण्यात आला असून, या फुटेजच्या आधारे पोलिसांनी तात्काळ तपास करून संबंधितांना ताब्यात घ्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात चोरी, लूट किंवा इतर कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी या परिसरात पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणीही करण्यात आली आहे.

> "चिखली प्राधिकरणातील सेक्टर ११, १२ आणि १३ या भागात काही अज्ञात व्यक्ती हातात कोयते घेऊन फिरत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस प्रशासनाने या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घेऊन संबंधितांना अटक करावी आणि चोरी किंवा इतर कोणत्याही गुन्हेगारी घटना घडू नयेत यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.
>
> - संजीवन सांगळे, अध्यक्ष, सोसायटी फेडरेशन

या निवेदनाची प्रत चिखली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनाही देण्यात आली असून, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्वरित आणि प्रभावी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### सीसीटीव्हीत कैद संशयित

चिखली प्राधिकरणातील विविध सोसायट्यांच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये हातात कोयते घेऊन फिरणाऱ्या संशयितांच्या हालचाली स्पष्टपणे कैद झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या फुटेजच्या आधारे संशयितांचा तातडीने शोध घेऊन त्यांना ताब्यात घ्यावे, तसेच परिसरात पोलिसांची गस्त वाढवून नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केली आहे.



## भूमिका

**केंद्र सरकारने विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याबाबत घेतलेला निर्णय अनेकांसाठी अनपेक्षित ठरला. विशेष म्हणजे, सरकारने अत्यंत कमी कालावधीत भूमिका बदलल्याने या निर्णयामागील कारणांची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.**

# जंतर-मंतरवरील 'झुरळां'ना कुणी मदत केली असेल?




याआधी अनेक आंदोलनांमध्ये सरकारने दीर्घकाळ कठोर भूमिका घेतली होती. मात्र, यावेळी अवघ्या काही आठवड्यांत परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न करण्यात आला.

विद्यार्थी आंदोलन सुरुवातीला मर्यादित स्वरूपाचे होते. परंतु कालांतराने त्याला विविध राज्यांमध्ये प्रतिसाद मिळू लागला. विविध सामाजिक आणि राजकीय संघटनांचा सहभाग वाढल्याने आंदोलनाचे स्वरूप व्यापक झाले. अशा परिस्थितीत आंदोलन अधिक चिघळल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता सुरक्षा यंत्रणांनी व्यक्त केल्याचे बोलले जाते. विशेषतः कोणतीही टोकाची घटना घडल्यास त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात, ही बाब सरकारसाठी चिंतेची ठरली असावी.

यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भूमिकेचीही चर्चा होत आहे. संघाकडून संवाद आणि समन्वयावर भर देण्यात आल्याचे संकेत मिळाले. तरुणांशी संघर्ष करण्यापेक्षा त्यांच्याशी संवाद साधणे अधिक योग्य ठरेल, हा संदेश सरकारपर्यंत पोहोचल्याचे मानले जाते. त्यामुळे संघर्ष वाढण्यापूर्वी तोडगा काढण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला असावा.

या संपूर्ण प्रकरणात आणखी एक मुद्दा चर्चेत आला तो म्हणजे काही आंदोलनांना प्रशासनाकडून मिळालेले कथित सहकार्य. विविध संघटनांना आंदोलनासाठी परवानगी देणे, त्यांच्या कार्यक्रमांना मिळालेली प्रशासकीय मुभा आणि काही घटनांमध्ये पोलिसांची भूमिका यावरून विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. लोकशाही व्यवस्थेत सर्वांना आंदोलनाचा अधिकार असला तरी प्रशासनाने सर्वांबाबत समान निकष ठेवणे आवश्यक असते. अन्यथा पक्षपातीपणाचा आरोप होण्याची शक्यता वाढते.

दरम्यान, शिक्षण मंत्रालयात नेतृत्वबदल झाल्यानंतर नवीन मंत्री प्रल्हाद जोशी यांच्यासमोर सर्वात मोठे आव्हान राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) सुधारण्याचे आहे. गेल्या काही वर्षांत नीट, यूजीसी-नेट यांसारख्या महत्त्वाच्या परीक्षांबाबत प्रश्नपत्रिका फुटीचे आरोप, तांत्रिक त्रुटी आणि व्यवस्थापनातील कमतरता सातत्याने समोर आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा विश्वास डळमळीत झाला आहे. देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षा प्रणाली अधिक विश्वासार्ह, पारदर्शक आणि सुरक्षित बनविणे ही काळाची गरज आहे. यासाठी केवळ नेतृत्वबदल पुरेसा ठरणार नाही. संस्थात्मक सुधारणा, सक्षम मनुष्यबळ, तांत्रिक सुरक्षा आणि उत्तरदायित्व यंत्रणा मजबूत करणे आवश्यक आहे. अन्यथा आंदोलनांची कारणे बदलतील, पण असंतोष कायम राहील.

सरकारने संघर्ष टाळण्यासाठी वेळेवर निर्णय घेतला असे म्हणता येईल. मात्र, या निर्णयामागील खरे यश तेव्हाच मानले जाईल, जेव्हा विद्यार्थ्यांचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित होईल आणि अशा आंदोलनांची गरज भविष्यात भासणार नाही.

## प्रासंगिक »

### भक्तिमार्ग

**कबीर एका रस्त्यावरून निघाले होते. एका घराच्या सोप्यावर दळण दळत असलेली स्त्री त्यांनी पाहिली. सुपातले दाणे ती जात्यात टाकत होती.**

अन् गरगर फिरणाऱ्या जात्यातून पीठ भरभर खाली पडत होते. हे दृश्य पाहून कबीर रडू लागले. बरेच लोक जमले.

पण कबिरांच्या रडण्याचे कारण कुणालाच उमजेना. कबिरही एकही शुब्द बोलेनात. पण त्यांच्या गालांवरून अश्रू मात्र ओघळत होते. इतक्यात तेथे आलेल्या साधूने त्यांना रडण्याचे कारण विचारले. तेव्हा कबीर म्हणाले, "महाराज ! तुम्ही-आम्ही त्या सुपातल्या दाण्यासा-रखे. जन्म-मृत्यूच्या जात्यात आपलं पीठ होणार, याचं दुःख वाटतं."

तेव्हा त्या साधूने त्यांना जात्याच्या खुं-ट्याजवळ असणारे दाणे दाखवून म्हटले, "जे दाणे खुंट्याच्या आधार घेतात, त्यांचं पीठ होत नाही, ते भरडले जात नाहीत.

- तात्पर्य : जे लोक भक्तिमार्गाचा आधार घेतात, त्यांच्या आयुष्याचे पीठ काळाकडून, नियतीच्या जात्याकडूनही होत नाही.

पाकिस्तानच्या ताब्यातील कथित 'आझाद जम्मू-काश्मीर'मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांदरम्यान उसळलेल्या हिंसाचाराने तेथील लोकशाही व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

# आझाद नव्हे, प्रश्नांकित लोकशाही!

मतदानाच्या दिवशी हिंसाचार, गोळीबार, मतपेट्यांमध्ये कथित हस्तक्षेप आणि नागरिकांच्या मृत्यूच्या घटनांमुळे निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हताच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. 'आझाद' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात जर नागरिकांना सुरक्षित वातावरणात मतदान करण्याची हमी मिळत नसेल, तर त्या स्वायत्ततेच्या दाव्याचे वास्तव तपासण्याची गरज निर्माण होते.



गेल्या काही वर्षांपासून या प्रदेशात वीजदरवाढ, महागाई, अन्नटंचाई आणि प्रशासकीय व्यवस्थेविरोधात सातत्याने आंदोलन होत असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. स्थानिक नागरिक आर्थिक न्याय, मूलभूत सुविधा आणि अधिक उत्तरदायी प्रशासनाची मागणी करत आहेत. या मागण्यांवर समाधानकारक तोडगा निघण्याऐवजी संघर्ष वाढत असल्याचे चित्र दिसते. अशा परिस्थितीत निवडणूक ही लोकशाही बळकट करण्याची संधी ठरण्याऐवजी तणावाचे कारण ठरत असेल, तर त्या व्यवस्थेचा पुनर्विचार आवश्यक ठरतो.

या प्रदेशाचे सामरिक महत्त्वही दुर्लक्षित करता येणार नाही. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरसारख्या मोठ्या प्रकल्पांमुळे या भागाला भू-राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे सुरक्षा, प्रशासन आणि स्थानिक जनतेच्या अपेक्षा यामध्ये संतुलन राखणे पाकिस्तानसमोर मोठे आव्हान आहे. मात्र, कोणत्याही देशासाठी दीर्घकालीन स्थैर्याचा पाया हा नागरिकांचा विश्वास आणि पारदर्शक प्रशासन असतो. तो कमकुवत झाला तर विकास प्रकल्पही असंतोषाच्या छायेत येऊ शकतात.

भारतासाठीही या घडामोडी महत्त्वाच्या आहेत. मात्र, अशा संवेदनशील विषयात संयम, वस्तुनिष्ठता आणि राजनैतिक परिपक्वता आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर तथ्यांवर आधारित भूमिका मांडणे आणि लोकशाही, मानवी हक्क व पारदर्शक निवडणूक प्रक्रियेच्या सार्वत्रिक मूल्यांवर भर देणे, ही अधिक परिणामकारक भूमिका ठरू शकते. कोणत्याही प्रकारची अनावश्यक प्रतिक्रिया किंवा राजकीय उत्तेजना टाळणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

लोकशाहीची खरी कसोटी निवडणूक घेण्यात नसते, तर नागरिकांना निर्भयपणे मतदान करता येणे, मतभिन्नतेचा आदर राखणे आणि मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यात असते. त्यामुळे कथित 'आझाद' काश्मीरमधील अलीकडील घडामोडी केवळ एका प्रदेशापुरत्या मर्यादित नाहीत; त्या लोकशाही, उत्तरदायित्व आणि जनविश्वास या व्यापक मूल्यांची आठवण करून देतात. कोणत्याही व्यवस्थेची वैधता ही केवळ नावावर नव्हे, तर नागरिकांच्या अनुभवावर आणि त्यांच्या अधिकारांच्या संरक्षणावरच अवलंबून असते.

## ।। अभंगवाणी ।।



ब्रम्हादिक जया लाभासि ठेंगणे ।
बळिये आम्ही भले शरणागत ॥१॥

कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ ।
जाला पद्मनाभ सेवाऋणी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# 'सेंट्रल किचन'चा मोठा घोटाळा उघड!

## परवान्याविनाच अन्नपुरवठा; FDA च्या धाडीत ११ नमुने जप्त, सहा जणांवर गुन्हा

**महाईन्यूज । अमरावती**

**मेळघाटातील टिटंबा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या अन्न विषबाधा प्रकरणाची व्याप्ती वाढली असून, अन्न व औषध प्रशासन (FDA) च्या तपासात गंभीर अनियमितता समोर आली आहे. आश्रमशाळांना अन्नपुरवठा करणारे 'सेंट्रल किचन' आवश्यक परवाना मिळण्यापूर्वीच सुरू करण्यात आल्याचे उघड झाल्याने प्रशासनाने कठोर कारवाईला सुरुवात केली आहे.**



या प्रकरणी प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांच्या आदेशानंतर धारणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार 'सेंट्रल किचन'च्या संचालकांसह सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

एफडीएच्या दोन पथकांनी सलग दोन दिवस तपासणी करत ११ प्रकारचे अन्न नमुने ताब्यात घेऊन प्रयोगशाळेत पाठविले. तसेच सुमारे ₹४ लाख ४१ हजार किमतीचा अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे.

तपासादरम्यान आश्रमशाळांमध्ये तयार अन्नपुरवठ्याचे कंत्राट पुणे येथील 'अधिक रिसॉर्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीला देण्यात आले होते. मात्र, कंपनीने अन्न व औषध प्रशासनाचा परवाना मिळण्यापूर्वीच 'सेंट्रल किचन' सुरू केल्याचे समोर आले आहे. मेळघाटातील चार आश्रमशाळांमध्ये सलग दोन दिवस विद्यार्थ्यांना अन्न विषबाधा झाल्यानंतर प्रशासनाने तपासाची व्याप्ती वाढविली आहे. अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांनी सांगितले की, एफडीएने आदिवासी उपायुक्तांना पत्र पाठवून जिल्ह्यातील इतर आश्रमशाळांमधील भोजन पुरवठा आणि संबंधित व्यवस्थेची माहितीही मागविली आहे.

> "एफडीएने आदिवासी उपायुक्त यांना पत्र पाठवून जिल्ह्यातील इतर आश्रमशाळांचा भोजन पुरवठा व आनुषंगिक बाबींवर माहिती मागविली आहे."
>
> - गजानन गोरे,
> अन्नसुरक्षा अधिकारी

### परवाना मिळण्याआधीच सेंट्रल किचन चालू

आश्रमशाळांमध्ये तयार अन्न पुरवण्याचे कंत्राट पुणे येथील 'अधिक रिसॉर्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीला देण्यात आले होते. त्यांनी एफडीएचा परवाना मिळण्याआधीच 'सेंट्रल किचन सेंटर' सुरू केल्याचे तपासात उघड झाले.

### एफडीची दोन दिवस तपासणी

धारणी येथील तब्बल चार आश्रमशाळांमध्ये अन्न विषबाधेच्या घटनेमुळे एफडीएचे पथक या ठिकाणी दोन दिवस तपासणीकरिता हजर होते. पथकाने ११ प्रकारचे अन्न नमुने ताब्यात घेऊन प्रयोगशाळेकडे तपासणीकरिता पाठविल्याची माहिती अन्न निरीक्षक घनश्याम दंदे यांनी दिली.

# पावसाचा प्रचंड तडाखा; तापोळा मार्ग खचला, १०५ गावे संपर्कविहीन



**महाईन्यूज । महाबळेश्वर**

**संततधार पावसामुळे महाबळेश्वर शहरापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावरील फळणे वस्ती परिसरातील तापोळा मुख्य रस्ता पूर्णपणे खचल्याने तापोळा खोऱ्यातील १०५ हून अधिक दुर्गम व अतिदुर्गम गावांचा महाबळेश्वरशी संपर्क तुटला आहे. रस्ता खचल्याची माहिती मिळताच प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत पर्यायी मार्ग उभारण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू केले आहे.**

### प्रशासनाकडून पर्यायी मार्गांचा शोध

रस्ता खचल्यामुळे तापोळा खोऱ्यातील शेकडो नागरिकांचा संपर्क तुटल्याने प्रशासनाने तातडीने पर्यायी मार्ग उभारण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. भुईमिया बंगल्यालगत तात्पुरता मार्ग तयार करण्यासह कारवी आळा–फळणे वस्ती मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याची शक्यता तपासली जात आहे. संपर्क पूर्ववत करण्यासाठी सर्व यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.



तहसीलदार सचिन मस्के, नगराध्यक्ष सुनील शिंदे, नगरसेवक आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी भुईमिया बंगल्यालगत लहान वाहनांसाठी तात्पुरता मार्ग तयार करण्यासह कारवी आळा–फळणे वस्ती मार्ग वाहतुकीसाठी खुला करता येईल का, याचीही चाचपणी सुरू आहे.

यंदाच्या पावसाळ्यात महाबळेश्वरमध्ये विक्रमी पर्जन्यमानाची नोंद होत आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी रस्ते खचणे, दरडी कोसळणे आणि वाहतूक विस्कळीत होण्याच्या घटना घडत आहेत. आतापर्यंत महाबळेश्वरमध्ये १५० इंचांहून अधिक पावसाची नोंद झाली आहे.

दरम्यान, ग्लेन ओगल धरणावरील तापोळा मार्गावरील एकमेव पूलही धोकादायक स्थितीत पोहोचला असून, दरवर्षी रस्ता खचणे आणि पुलाची दुरवस्था यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

याचवेळी केळघर घाटात मोठी दरड कोसळल्याने सातारा-मेढा मार्गे महाबळेश्वरकडे जाणारी वाहतूक तब्बल १५ तास ठप्प झाली होती. रस्ता हलक्या वाहनांसाठी खुला करण्यात आला असला तरी मोठ्या वाहनांसाठी वाहतूक अद्याप बंद आहे.

# थायलंडची स्वस्त ट्रीप पडली महागात

## स्वस्तात सफर घडवून आणण्याचे आमिष दाखवून तीन भारतीयांचे अपहरण

**महाईन्यूज । थायलंड**

**थायलंडमध्ये फिरायला जाण्याचे स्वप्न अनेकांचे असते. गेल्या काही वर्षांत थायलंड आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र म्हणून कमालीचे प्रसिद्ध झाले. मात्र आता याच थालंडमध्ये अनेक गैरप्रकार होत असल्याचे समोर येत आहेत. यापूर्वी सायबर घोटाळ्यांसाठी थायलंडमार्गे म्यानमारला नेले जात होते. यानंतर आता एक नवी गुन्ह्याची पद्धत विकसित झाली आहे. कमी पैशांत थायलंड सफरीचे आमिष दाखवून भारतीय पर्यटकांना तिथे ओलीस ठेवण्याचे प्रकार सुरू झाले आहेत.**



हे सर्व भारतीय नागरिक असल्याचे समोर आले आहे. तर गुन्ह्यात सामील असलेल्या पाकिस्तानी नागरिकांचा अद्याप शोध लागलेला नाही. अवतार सिंग, जगजीत सिंग, रामबालक कुमार, सुखबीर सिंग आणि कुलरा सिंग अशी अटक झालेल्या आरोपींची नावे आहेत.

बँकॉक पोस्टने दिलेल्या बातमीनुसार, थाइ पोलिसांनी २७ जुलै रोजी पट्टायाच्या बँग लामंग जिल्ह्यातील एका दुमजली घरातून २३ ते २६ वयोगटातील तीन पीडित तरुणांची सुटका केली. अपहरणकर्त्यांनी या तीन तरूणांना थायलंडमधील सात दिवसांच्या सहलीचे अतिशय स्वस्त पॅकेज दिले होते. मात्र थायलंडमध्ये पोहोचताच तिघांचे अपहरण करून त्यांना ओलीस ठेवले गेले. तिघांच्या कुटुंबीयांकडून एकत्रितपणे ७० लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली.

बँकॉक पोस्टला पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तीनही पीडितांनी सात दिवसांच्या सहलीसाठी प्रत्येकी ७०,००० बाथ (म्हणजेच २ लाख रुपये) भरले होते. २१ जुलै रोजी तिघे बँकॉकच्या सुवर्णभूमी विमानतळावर उतरले. यानंतर तिघेही टॅक्सीने पट्टाया येथे पोहोचले. सुखुमवित महामार्गावरील एका फास्ट-फूड हॉटेलमध्ये त्यांची आरोपींबरोबरची भेट ठरली होती.

फास्ट-फूड हॉटेलमध्ये त्यांना एक भारतीय व्यक्ती भेटली. ज्याने दुचाकीवरून एक-एक करून तिघांना भाड्याच्या खोलीत नेले. तिथे चार पाकिस्तानी आणि एका भारतीय नागरिकाने त्यांना बंधक बनवले. पोलिसांनी सोमवारी जेव्हा या भाड्याच्या घरी धाड टाकली तेव्हा दोन बेडरूममध्ये पीडित बांधलेल्या अवस्थेत आढळले. पीडितांच्या घोट्यावर कठीण वस्तूने वारंवार मारहाण केल्याच्याही खुणा आढळून आल्या.

### नेमके प्रकरण काय?

थायलंडमधील डेली बँकॉक पोस्ट या दैनिकाने याबाबतचे वृत्त दिले आहे. या वृत्तानुसार, भारतीय आणि पाकिस्तानी नागरिक मिळून हे रॅकेट चालवत होते. कमी खर्चातील थायलंड सफरीचे आमिष दाखवून भारतीयांना थायलंडमध्ये आणले जात होते. तिथे आल्यानंतर पर्यटकांचे अपहरण करत त्यांना ओलीस ठेवले जाई. यानंतर त्यांच्या घरातून खंडणी मिळवण्यासाठी छळ केला जात असे. या गुन्ह्याप्रकरणी पाच गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे.

# CJP च्या आंदोलकांवर गोळ्या चालवण्याचे आदेश अमित शाहांचेच

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**लोकसभेत परीक्षा सुधारणा विधेयकावर चर्चा सुरु असताना राहुल गांधी यांनी भाषण केलं. राहुल गांधी यांनी विद्यार्थी आंदोलनाचं कौतुक केलं. तसंच राहुल गांधी यांनी असंही म्हटलं आहे की CJP च्या विद्यार्थी आंदोलनाचं सगळ्या पक्षांनी मतभेद बाजूला ठेवून कौतुक केलं पाहिजे. भारतात तीन प्रकारचे लोक आहेत हे विद्यार्थी मला म्हणाले ते म्हणजे विद्यार्थी, मूर्ख आणि अंधभक्त असंही राहुल गांधी म्हणाले ज्यानंतर गदारोळ झाला. तो शांत होत नाही तोच अमित शाह यांच्यावर राहुल गांधींनी आरोप केला.**



### राहुल गांधींचा अमित शाह यांच्यावर आरोप काय?

"CJP च्या आंदोलक विद्यार्थ्यांवर पॅलेट गन चालवण्याचे आणि त्यांचं रक्त सांडण्याचे आदेश अमित शाह यांनी दिले आहेत. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी येऊन स्पष्टीकरण दिलं पाहिजे. अमित शाह सभागृहात आलेले नाहीत. कारण ते या प्रकरणी उत्तर द्यायला घाबरत आहेत. अमित शाह हे देशाचे सो कॉल्ड गृहमंत्री आहेत. त्यांच्या आदेशानेच पॅलेट गनमधून गोळ्या झाडण्यात आल्या" असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला. ज्यानंतर लोकसभेत जोरदार गदारोळ पाहण्यास मिळाला. तुम्ही सभागृहाचे नियम मोडत आहात असं करु नका. असं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधींना समजावलं. तसंच किरेन रिजेजू यांनीही याबाबत भाष्य केलं.

राहुल गांधींनी हे सांगावं की त्यांनी कुठल्या पुराव्यांच्या आधारे अमित शाह यांच्यावर आरोप केला? सदनाला त्यांनी अधिकाऱ्यांना मिळालेल्या ऑर्डरची कॉपी दाखवावी किंवा कुठल्या समितीने हा अहवाल दिला असेल तर तो दाखवा. तुम्ही एखाद्यावर काहीही आरोप कराल आणि संसद ते ऐकून घेईल हे चालणार नाही. आम्ही हे म्हणू का की राहुल गांधींनी हत्या केली तर चालेल का? तुम्ही देशाच्या गृहमंत्र्यांचं नाव घेऊन इतका मोठा आरोप कसा काय केला? त्याबाबत पुरावे सादर करा किंवा माफी मागा अथवा जे बोललात त्याबाबत दिलगिरी व्यक्त करा अशी ताकिद किरेन रिजेजू यांनी राहुल गांधींना दिली. तसंच ओम बिर्ला म्हणाले की सभागृहाची मर्यादा पाळून बोलायचं असेल तरच बोला. अखिलेश यादव यांनीही एक भाष्य या दरम्यान केलं.


गदारोळाच्या दरम्यान अखिलेश यादव यांनी उभं राहून हे म्हटलं आहे की जर राहुल गांधी म्हणत आहेत तसं घडलं नसेल तर पॅलेट गन चालवण्याचे आदेश कुणी दिले होते? ते सांगा, त्याची चौकशी झाली पाहिजे. यावरही किरेन रिजेजू उभे राहिले आणि म्हणाले की तुम्ही म्हणत आहात ती मागणी रास्त आहे. पण राहुल गांधींनी अमित शाह यांचं नाव घेऊन आरोप केला आहे. ज्याला कुठलाही पुरावा नाही. त्यामुळे तुमचं म्हणणं आणि त्यांनी केलेला आरोप यात फरक आहे.

राहुल गांधींनी अमित शाह यांच्यावर आरोप करताच संसदेत प्रचंड गदारोळ पाहण्यास मिळाला. त्यानंतर भाजपाचे खासदार आणि विरोधी पक्षातले खासदार यांनी घोषणाबाजी सुरु केली. या दरम्यानही सातत्याने राहुल गांधींना समज दिली जात होती. त्यावर राहुल गांधी उभे राहिले आणि बळाचा वापर करण्याचे आदेश गृहमंत्रीच देऊ शकतात असं म्हटलं ज्यानंतर गदारोळ आणखी वाढला.

# क्रिस्टल डिसूझाला धमकीचे पत्र



टीव्ही अभिनेत्री क्रिस्टल डिसूझा सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. क्रिस्टलला तिच्या गाडीवर एक संशयास्पद पत्र मिळालं असून याचसंदर्भातील व्हिडिओ तिने चाहत्यांसमोर आणला आहे. तिच्या कारवर एक धमकीचे पत्र सापडले आहे, जे पाहून तिला मोठा धक्का बसला आहे. या पत्राद्वारे कोणीतरी तिच्यासोबत मस्करी करत आहे किंवा तिला धमकावण्याचा प्रयत्न करत आहे. 'तुझं सत्य लवकरच समोर येईल', असं या पत्रात लिहिलेलं आहे. हे पत्र वाचून घाबरलेल्या क्रिस्टलने सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट केला आहे. या पत्रावर तिचे नाव लिहिलेले आहे आणि ते कारवर कोणी चिकटवले हे तिलाही माहित नाही. त्यामुळे तिने व्हिडिओ शेअर करत आपला राग व्यक्त केला आहे. व्हिडिओमध्ये क्रिस्टल म्हणते, "मी आताच कामावरून मोकळी झाले असून पार्किंग एरियामध्ये आले आहे. ही माझी कार आणि या कारच्या विंडशील्डवर मला हे दिसले." हे सांगत क्रिस्टल ते पत्र उचलते आणि वाचू लागते.



# हट्टी, लहरी पण मनाने निरागस!

बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री श्रद्धा कपूर आज आपल्या अभिनयासोबतच साधेपणा आणि निरागस स्वभावासाठीही ओळखली जाते. मात्र, तिच्या या शांत स्वभावामागे एक हट्टी आणि लहरी बाजूदेखील आहे, असा खुलासा तिचे वडील आणि ज्येष्ठ अभिनेते शक्ती कपूर यांनी एका जुन्या मुलाखतीत केला होता. त्यांनी श्रद्धाच्या बालपणापासून तिच्या स्वभावापर्यंत अनेक खास गोष्टी सांगितल्या होत्या. शक्ती कपूर यांनी २०१४ मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत सांगितले होते की, श्रद्धा लहानपणापासूनच तिच्या आजोळी जास्त वाढली. तिची मावशी पद्मिनी कोल्हापुरे आणि तेजस्विनी कोल्हापुरे यांच्यासोबत तिचा बराच वेळ जायचा. त्या दोघींचा तिच्यावर मोठा प्रभाव पडला. घरातील सर्वांची ती लाडकी असल्याने तिचा स्वभाव थोडासा हट्टी, लहरी आणि विक्षिप्त झाला, असे त्यांनी हसत-हसत सांगितले. शक्ती कपूर म्हणाले होते की, श्रद्धाचे काही नखरे नक्कीच आहेत. मात्र, तिची एक चांगली गोष्ट म्हणजे तिची समजूत सहज काढता येते. ती मनाने खूप चांगली आहे. पण तिच्या वाटेला जाण्याचे किंवा तिला मुद्दाम चिडवण्याचे धाडस कोणी करू नये, असेही त्यांनी गंमतीत म्हटले होते. श्रद्धा रागावली की कशी वागते, याबाबतही त्यांनी एक खास किस्सा सांगितला होता. त्यांच्या मते, जर कोणी श्रद्धाला दुखावले किंवा तिचा मूड खराब झाला, तर ती स्वतःला खोलीत बंद करून घेते. काही तास ती कोणाशीही बोलत नाही. त्यामुळे घरातील वातावरणही काही काळ तणावपूर्ण होते. मात्र, थोडा वेळ गेल्यानंतर ती पुन्हा पूर्वीसारखी वागू लागते.




# द ओडिसी'वर कौतुकाचा वर्षाव

प्रसिद्ध दिग्दर्शक ख्रिस्तोफर नोलान याच्या सिनेमांची वाट त्याचे चाहते वेड्यासारखी पाहत असतात. नोलान हा नेहमी प्रेक्षकांना सिनेमांच्या माध्यमातून काहीतरी नवं देण्याचा प्रयत्न करत असतो. आता तो 'द ओडिसी' या सिनेमामुळे चर्चेत आहे. या सिनेमाला भारतात देखील प्रचंड प्रेम मिळालं आहे.

१७ जुलै रोजी रिलीज झालेल्या या सिनेमाने भारतात बक्कळ कमाई करत बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. एकीकडे मोठं यश या सिनेमाला मिळालं असताना दुसरीकडे मात्र, या सिनेमाला घेऊन प्रोफेसर आणि लेखिका एमिली विल्सन यांनी सिनेमावर भाष्य करताना धक्कादायक विधान केलं आहे. या सिनेमात नोलान यांनी कोणताही सेXX सीन ठेवलेला नाही. त्यांच्या या विधानाची जोरदार चर्चा होत असून, सिनेमावर दिलेली प्रतिक्रिया देखील चर्चेत आहे. या सिनेमाची कथा प्राचीन ग्रीक कवी होमर यांच्या 'ओडिसी' या प्रसिद्ध महाकाव्यावर आधारित आहे. मात्र, दिग्दर्शक क्रिस्तोफर नोलेन यांनी हा सिनेमा बनवताना प्रोफेसर Emily Wilson यांच्या इंग्रजी पुस्तकाचा 'द ओडिसी'चा आधार घेतला होता. हे पुस्तक २०१७ साली प्रकाशित झालं होतं. या पुस्तकाची देखील मोठी चर्चा झाली होती. पुस्तकावर कौतुकाचा वर्षाव झाला याशिवाय लेखिका Emily Wilson यांची प्रशंसा करण्यात आली. ख्रिस्तोफर नोलान यांच्या कामावर खुश नसल्याचे म्हणत Emily Wilson यांनी नकारात्मक प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या "होमरच्या रचनेवर छेडछाड करण्यात आली आहे. या सिनेमात इमोशनल, एथिकल, पॉलिटिकल खोलीची कमी आहे. या सिनेमात नोलान यांनी कोणताही सेXX सीन ठेवलेला नाही. लंडन बुक्स ऑफ रिव्ह्यूमध्ये त्यांनी याविषयी एक लेख लिहिला असून त्या म्हणतात "मला आशा होती की होमरच्या थीमला प्रेरित होऊन ख्रिस्तोफर नोलान यावेळी काहीतरी वेगळं आणि हटके करणार आहेत. पण तसं झालं नाही. हा सिनेमात भव्य आहे; पण कथेत खोली नाही. काही सीन्स खरंच कौतुकास्पद आहेत."

# स्मृतीची वादळी फटकेबाजी

## चौकार-षटकारांची आतषबाजी करत संघाला मिळवून दिला दणदणीत विजय

महाईन्यूज । लंडन

**भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधनाने तिच्या धुवांधार फलंदाजीच्या जोरावर क्रिकेटप्रेमींची मने जिंकली आहेत. जगातील सर्वात स्फोटक सलामीवीरांपैकी एक असलेल्या स्मृतीने सध्या 'द हंड्रेड २०२६' या स्पर्धेत आपल्या फलंदाजीने चांगलाच धुमाकूळ घातला आहे. मँचेस्टर सुपर जायंट्स संघाकडून खेळताना मानधनाने सनरायझर्स लीड्सविरुद्ध हेडिंग्लेच्या मैदानावर आक्रमक फलंदाजीचा नजराणा पेश केला.**





१४३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना स्मृतीने ५० चेंडूंत ८८ धावांची नाबाद खेळी साकारली. तिच्या या झुंझावत खेळामुळे मँचेस्टर सुपर जायंट्सने ४ चेंडू आणि ४ गडी राखून अत्यंत रोमांचक विजय मिळवला.

१४३ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या मँचेस्टर सुपर जायंट्सची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. कर्णधार मेग लॅनिंग अवघ्या २४ धावा करून बाद झाली. त्यानंतर ठराविक अंतराने संघाचे फलंदाज तंबूत परतत गेले. अवघ्या ७१ धावांवर संघाची अर्धी फलंदाजी कोलमडली होती. पेज शॉफिल्ड, रिचा घोष आणि मॅडी व्हिलियर्स यांसारख्या स्टार फलंदाजांना दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही. संपूर्ण संघात स्मृती मानधना आणि मेग लॅनिंग वगळता एकाही फलंदाजाला १० चा आकडा पार करता आला नाही. मात्र, एका बाजूने पडझड होत असताना स्मृतीने दुसरी बाजू भक्कमपणे लावून धरली आणि अवघ्या ३३ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले.

संघाला अंतिम २५ चेंडूंत ४४ धावांची गरज असताना स्मृतीने आपल्या आक्रमक खेळाचा गिअर बदलला. तिने भारताचीच सहकारी खेळाडू दीप्ती शर्माच्या गोलंदाजीवर गगनभरारी घेणारा उत्तुंग षटकार ठोकला. ९१ व्या चेंडूवर स्मृतीला एक जीवनदान मिळाले, ज्याचा पुरेपूर फायदा उठवत तिने सलग दोन षटकार खेचून सामन्याचा निकाल मँचेस्टरच्या बाजूने लावला. आपल्या ८८ धावांच्या नाबाद खेळीत स्मृतीने ७ चौकार आणि ४ उत्तुंग षटकारांची आतषबाजी केली.

तत्पूर्वी, डॅनी गिब्सनच्या नेतृत्वाखालील सनरायझर्स लीड्स संघाने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना १०० चेंडूंत ४ गड्यांच्या मोबदल्यात १४२ धावा उभारल्या होत्या. टीमकडून फोएबे लिचफिल्ड (३१), ॲनाबेल सदरलँड (३५), ब्रायोनी स्मिथ (२६) आणि कर्णधार गिब्सनने (नाबाद १८) महत्त्वपूर्ण योगदान दिले. मात्र, अखेर स्मृती मानधनाची धडाकेबाज खेळी या सर्वांच्या कामगिरीवर भारी पडली.

### स्मृतीच्या नावावर अनेक मोठ्या विक्रमांची नोंद

स्मृतीने केलेली नाबाद ८८ धावांची खेळी ही 'द हंड्रेड २०२६' च्या यंदाच्या हंगामातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या ठरली आहे. याशिवाय 'द हंड्रेड' स्पर्धेच्या इतिहासातील स्मृती मानधनाची ही सर्वोत्तम वैयक्तिक धावसंख्या आहे. याआधी २०२१ मध्ये तिने सदर्न ब्रेव्ह संघाकडून खेळताना ७८ धावांची खेळी केली होती. 'द हंड्रेड' स्पर्धेत कोणत्याही भारतीय फलंदाजाने केलेली ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. या यादीत अव्वल स्थानी जेमिमा रॉड्रिग्स असून तिच्या नावावर नाबाद ९२ धावांचा विक्रम नोंदवलेला आहे.

# राष्ट्रकुलच्या ट्रॅकवर भारताची पहिल्यांदाच 'रूपेरी' कामगिरी

महाईन्यूज । नवी दिल्ली

**भारताच्या लॉंग डिस्टन्स स्टार गुलवीर सिंगने राष्ट्रकुल स्पर्धेत इतिहास रचला. तो राष्ट्रकुल स्पर्धेत १०००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्य पदक जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. ग्लासग्लो इथं सुरू असलेल्या राष्ट्रकुल २०२६ स्पर्धेत त्याने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. तो चार मिनिटाच्या आत एक मैल रेस पूर्ण करणारा तसेत ६० मिनिटांच्या आत हाफ मॅरेथॉन संपवणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. त्यामुळे तो देशाचा सर्वात महान डिस्टन्स रनर ठरला.**





### कोण आहे गुरवीर सिंग?

गुलवीर सिंगबाबत बोलायचं झालं तर तो उत्तर प्रदेशातील सिरसा मधील एका गावातून येतो. तो भारतीय लष्करात नायब सुभेदार या पोस्टवर आपली सेवा देत आहे. तो ग्रेनेडियर रेजिमेंटचा भाग असून तो २०१८ मध्ये सेनेत दाखल झाला आहे. तो भारताचा एक उद्योन्मुख लॉंग डिस्टन्स रनर आहे. गुलवीर सिंगने एशियन चॅम्पियनशिपमध्ये आणि एशियन्स गेममध्ये पदक जिंकले असून त्याने एशियन ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये ५००० आणि १०००० मीटरमध्ये सुवर्ण पदक जिंकून तो आशियातील सर्वोत्तम लॉंग डिस्टन्स रनर असल्याचं सिद्ध करून दाखवलं आहे. त्याने भारतात अनेक रेकॉर्ड्स आपल्या नावावर केले आहेत.

२७ वर्षाच्या भारताच्या सर्वात चांगल्या डिस्टन्स रनरने मोठ्या स्तरावर आपलं नाणं खणखणीत वाजवून दाखवलं. त्याने 27:49.78 अशी वेळ नोंदवत दुसरा क्रमांक पटकावला. ऑस्ट्रेलियाच्या काय रॉबिन्सनने सुवर्णपदक पटकावलं. तर डेव्हिड मुलरकीने कांस्य पदक पटकावलं. लॉंग डिस्टन्समध्ये दमदार कामगिरी करणाऱ्या केनिया आणि युगांडाच्या खेळाडूंना पदकापासून वंचित रहावं लागलं.

गुलवीरनं सुरूवातीपासूनच रेसमध्ये आघाडी घेतली होती. त्याने एशियन्स गेममध्ये देखील कांस्य पदकाची कमाई केली होती. ग्लासगोच्या स्टेडियमवर मोठा पाऊस पडत होता. त्यामुळं त्याला कठिण परिस्थितीत धावावं लागत होतं. मात्र असं असलं तरी गुलवीरने शेवटच्या राऊंडमध्ये आपला सगळा जोर लावला. त्याने दुसऱ्या स्थानावर रेस पूर्ण केली. त्यानंतर त्याने चांगलाच जल्लोष केला. भारताने या स्पर्धेत पहिल्यांदाच पदकाला गवसणी घातली.

भारताने सहाव्या दिवशी जिंकलेले हे दुसरे मेडल होतं. त्यापूर्वी हरजींदर कौरने महिला वेटलिफ्टिंग ६९ किलो वजनी गटात दुसरे स्थान पटकावत रौप्य पदकाची कमाई केली होती. भारताची आता एकूण पदकांची संख्या ही १२ झाली आहे. बॉक्सिंगमध्ये प्रिती पवार, प्रियांका घनघास आणि जदुमनी सिंग यांनी पदक निश्चित केले आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। गुरुवार ।
दि. 30 जुलै 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE

ABOUT THE PROGRAMME

# WHY EXECUTIVE MBA?




The **DYPIU Executive MBA** is designed for ambitious working professionals who aspire to accelerate their careers without interrupting them. The programme combines rigorous management education with practical industry exposure, leadership development, and strategic business thinking to prepare professionals for senior leadership roles in a dynamic business environment.

## PROGRAM HIGHLIGHTS

**WEEKEND CLASSES**
Designed for working professionals. Sat & Sun schedule.

**INDUSTRY EXPERTS**
Learn from experienced faculty & indsutry practitioners.

**LIVE PROJECTS**
Solve real business problems & gain hands-on experience.

**LEADERSHIP DEVELOPMENT**
Build leadership skills for today's dynamic business challenges.

**CASE STUDY LEARNING**
Global case study Interactions & practical applications.

**CROSS FUNCTIONAL EXPOSURE**
Understand businesses across multiple functions.

**INDUSTRY IMMERSION**
Industry Visits & Expert Sessions for deeper insights.

**CAREER ACCELERATION**
Accelerate career growth through practical learning & leadership development.

## LEARNING JOURNEY

**SEM I — BUSINESS FOUNDATIONS**
- Management Principles
- Economics for Managers
- Accounting & Financial Analysis
- Business Communication

**SEM II — FUNCTIONAL MANAGEMENT**
- Marketing Management
- Financial Management
- Human Resource Management
- Operations & Supply Chain Management

**SEM III — LEADERSHIP & STRATEGY**
- Strategic Management
- Business Analytics for Decision Making
- Leadership & Organizational Behaviour
- Electives

**SEM IV — SPECIALISATION & INTEGRATION**
- Electives (Choose your path)
- Industry Project / Consultancy
- Capstone Business Simulation
- Integration & Future Ready Skills

CHOOSE YOUR SPECIALISATION

MARKETING ANALYTICS | HR ANALYTICS | IT & ANALYTICS | FINTECH | SUPPLY CHAIN MANAGEMENT | INTERNATIONAL BUSINESS

## YOUR LEADERSHIP JOURNEY

**EXECUTIVE** — Build Strong functional expertise
→ **SENIOR MANAGER** — Lead teams & drive business performance
→ **BUSINESS LEADER** — Shape strategy & lead transformation
→ **STRATEGIC DECISION MAKER** — Drive impact & create long-term value

DESIGNED TO TRANSFORM PROFESSIONALS INTO LEADERS.
ELEVATE YOUR CAREER. EXPAND YOUR POTENTIAL.

## ELIGIBILITY & ADMISSIONS

**ELIGIBILITY**
Graduation in any discipline with minimum 2 years of work experience.

**SELECTION PROCESS**
Application Review | Personal Interview | Work Experience Evaluation

**INTAKE (60 SEATS)**
Limited Seats. Apply Early.

**PROGRAMME FEE**
Competitive & value-driven fee structure. Easy payment options available.

APPLY NOW

SCAN TO KNOW MORE

43 YEARS ACADEMIC EXCELLENCE

**PRESTIGIOUS LEGACY**
Part of Dr D Y Patil Group with a strong legacy in education since 1984

**GLOBAL PRESPECTIVE**
Industry-aligned curriculum with global insights and fututre-ready learning.

**STRONG NETWORK**
Connect with accomplished peers, alumni and industry leaders.

www.dypiu.ac.in/mba-executive
admissions@dypiu.ac.in
+91 8956740916

# जनधन योजना : आर्थिक समावेशनाचा मजबूत स्तंभ

## बँक खाती, विमा आणि डिजिटल सेवांचा विस्तार; 'डीपीयू'चा संशोधन अहवाल

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारत सरकारच्या 'प्रधानमंत्री जन धन योजने'ने (PMJDY) देशातील बँकिंग सेवांपासून वंचित असलेल्या मोठ्या घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यात आणि आर्थिक समावेशनाला चालना देण्यात अत्यंत प्रभावी भूमिका बजावली आहे, असा निष्कर्ष डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या (अभिमत विद्यापीठ) 'ग्लोबल बिझनेस स्कूल अँड रिसर्च सेंटर' मधील संशोधनातून समोर आला आहे.**



हे संशोधन डॉ. निलोफर ए. सय्यद यांनी त्यांचे संशोधन मार्गदर्शक डॉ. बाबासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पूर्ण केले आहे. या संशोधनाद्वारे पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांपर्यंत 'जन धन' योजनेचे लाभ प्रत्यक्ष कसे पोहोचत आहेत, बँकिंग सेवांचा वापर कोणत्या प्रमाणात होत आहे आणि सर्वसामान्य लोकांमध्ये आर्थिक साक्षरतेचे प्रमाण किती आहे, याचा सखोल आढावा घेण्यात आला आहे.

अभ्यासाची पार्श्वभूमी आणि उद्दिष्ट: भारताची आर्थिक प्रगती वेगाने होत असली, तरी ऐतिहासिकदृष्ट्या लोकसंख्येचा एक मोठा भाग बँकिंग प्रणालीच्या कक्षेबाहेर होता. हे आव्हान पेलण्यासाठी केंद्र सरकारने २०१४ मध्ये 'प्रधानमंत्री जन धन योजना' सुरू केली. या योजनेचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत कसा पोहोचत आहे, बँकिंग सेवांचा वापर कसा होतोय, तसेच लोकांमध्ये आर्थिक साक्षरता किती आहे, याचा सखोल आढावा या संशोधनात घेण्यात आला. सामाजिक व औद्योगिक क्षेत्रासाठी योगदान: हे संशोधन धोरणकर्ते, भारतीय रिझर्व्ह बँक (RBI), व्यापारी बँका आणि सरकारी संस्थांना पुढील धोरणे आखण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यातून प्राप्त माहितीमुळे बँकांना ग्रामीण भागात आर्थिक साक्षरता वाढवणे, डिजिटल पायाभूत सुविधांचा विस्तार करणे, महिला सक्षमीकरण आणि दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना अधिक प्रभावीपणे राबवणे शक्य होईल.

संशोधकांचे कौतुक व अभिनंदन: या उत्कृष्ट आणि समाजोपयोगी संशोधनाबद्दल संशोधक डॉ. निलोफर सय्यद आणि मार्गदर्शन डॉ. बाबासाहेब जाधव यांचे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे माननीय कुलपती डॉ. पी. डी. पाटील, प्र- कुलपती डॉ. भाग्यश्रीताई पाटील, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, सचिव व प्र-कुलगुरू डॉ. स्मिता जाधव, प्राध्यापक एमेरिटस व संशोधन प्रमुख डॉ. सचिन वर्णेकर, तसेच संचालक व अधिष्ठाता डॉ. मनीष सिन्हा, संशोधन समन्वयक डॉ. नईम शेख यांनी विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### योजनेपुढील प्रमुख आव्हाने

- लाभार्थ्यांमध्ये अजूनही पूर्ण आर्थिक साक्षरतेचा अभाव असणे.
- काही बँक खाती निष्क्रिय (DORMANT) राहणे.
- कागदपत्रे व 'केवायसी' (KYC) संबंधित अडचणी.
- ग्रामीण भागात डिजिटल पायाभूत सुविधांची अपुरी उपलब्धता.
- ग्रामीण भागात सेवा देणाऱ्या 'बिझनेस करस्पॉन्डंट' (BC) प्रतिनिधींचे जाळे अधिक भक्कम करण्याची गरज.

### संशोधनातील महत्त्वाचे निष्कर्ष

- बँकिंग सेवांचा विस्तार: जन धन योजनेमुळे पूर्वी बँकिंग सुविधांपासून वंचित असलेल्या घटकांना आता सहजपणे अधिकृत बँकिंग सेवा उपलब्ध झाल्या आहेत.
- योजनेविषयी मोठी जागरूकता: शून्य-शिल्लक (ZERO BALANCE) खाती, 'रुपे' (RUPAY) डेबिट कार्ड, अपघात विमा आणि ओव्हरड्राफ्ट सुविधा यांसारख्या वैशिष्ट्यांची माहिती सामान्य लाभार्थ्यांपर्यंत चांगल्या प्रकारे पोहोचली आहे.
- बचत व डिजिटल व्यवहारांना गती: या योजनेमुळे नागरिकांमध्ये बचतीची सवय वाढली असून, त्यांची आर्थिक सुरक्षितता सुधारली आहे. तसेच डिजिटल बँकिंगचा वापर वाढण्यास प्रोत्साहन मिळाले आहे.

# रावेत येथील सिल्वर गार्डनीया सोसायटीत रक्तदान शिबीर उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**"रक्तदान हेच श्रेष्ठ दान" या सामाजिक भावनेतून रावेत येथील सिल्वर गार्डनीया सोसायटीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला रहिवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमात तब्बल ६८ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली सामाजिक बांधिलकी जपत मानवतेचा संदेश दिला.**




### 'दिनेश ॲडव्हर्टायझिंग' यांचे विशेष सहकार्य

या सामाजिक उपक्रमाला 'दिनेश ॲडव्हर्टायझिंग' यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे रक्तदान शिबिराचे नियोजन अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य झाल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली. रक्ताची वाढती गरज लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात रक्तदानाविषयी जनजागृती होण्यास आणि गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मोठी मदत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन सोसायटीचे चेअरमन विक्रांत साळुंखे आणि सेक्रेटरी चेतन इंगळे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी खजिनदार सचिन पाटील, व्यवस्थापक आर. जे. पगारे, सदस्य तेजस्विता काजळे, अरुणा सीलम, सुजाता पाटील, आयुष पाटील, दिनेश लिंगवत तसेच सोसायटीतील अनेक मान्यवर आणि रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान शिबिराचे संपूर्ण नियोजन सोसायटीचे व्यवस्थापक आर. जे. पगारे यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडले. रक्तदाते, स्वयंसेवक आणि आयोजक यांच्यात उत्तम समन्वय साधत संपूर्ण उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. रक्तदात्यांसाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा, नोंदणी, तपासणी आणि रक्तसंकलनाची व्यवस्था सुयोग्य पद्धतीने करण्यात आली होती.

यावेळी सोसायटी प्रशासनाने भविष्यातही आरोग्य, सामाजिक जनजागृती आणि लोकहिताशी संबंधित विविध उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. रहिवाशांनीही अशा समाजोपयोगी उपक्रमांना नेहमीप्रमाणेच सक्रिय सहकार्य देण्याची ग्वाही दिली. या रक्तदान शिबिराला रहिवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, समाजहितासाठी रक्तदानासारख्या पवित्र कार्यात सहभागी झालेल्या सर्व रक्तदात्यांचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

# गुरुजनांना अभिमान वाटेल असे कर्तृत्व करा

## पीसीयुच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी मध्ये भावी अभियंत्यांचे उत्साहात स्वागत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**जीवनातील महत्त्वाची चार वर्षे अभियांत्रिकीची पदवी मिळवण्यासाठी द्यावी लागतात. पीसीयू मधील उच्च विद्या विभूषित प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरचा पाया उभारावा, त्यासाठी पीसीईटीने गुणवत्ताधिष्ठित शिक्षणव्यवस्था उभारली आहे, त्याचा लाभ घ्यावा आणि आपल्या माता, पिता व गुरुजनांना अभिमान वाटेल असे कर्तृत्व सिद्ध करावे असे मार्गदर्शन पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले.**



### आयोजक

हा कार्यक्रम पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन प्रतिनिधी सदस्य नरेंद्र लांडगे आणि अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ कॅम्पस मध्ये स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ हा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना हर्षवर्धन पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रथम वर्ष बीटेक च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, लार्सन अँड टुब्रो कंपनीचे जनरल मॅनेजर के. वेंकटेशन, पीसीयुचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, पीसीयूचे सल्लागार डॉ. शितलकुमार रवंदळे, संचालक, आऊटरीच अँड ॲडमिशन्स प्रमुख डॉ. रामदास बिरादार आदी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पीसीयूच्या उत्कृष्ट पायाभूत सुविधांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना शिस्त, क्रीडा, सहशैक्षणिक उपक्रम आणि लिंक्डइन सारख्या व्यावसायिक नेटवर्किंग प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करून प्रत्येक संधीचे सोने करावे असे सांगितले. के. वेंकटेशन यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या प्रगतीची जबाबदारी घ्यावी. अभियांत्रिकीची मूलभूत तत्त्वे आत्मसात करून समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करावी. त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जनरेटिव्ह एआय चा प्रभावी वापर करण्याचा सल्ला दिला.

डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी सांगितले की, विकसित भारत चे ध्येय साध्य करण्यासाठी अभियांत्रिकी क्षेत्रात जास्त संधी आहेत. पीसीईटीचा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील ४००० पेक्षा जास्त शिक्षण, संशोधन आणि उद्योग संस्थांशी संपर्क आहे. यातील बहुतांशी संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, व्यवसाय नोकरीसाठी मार्गदर्शन व गुंतवणूक सल्ला उपलब्ध करून देण्यात येतो. उदयोन्मुख तंत्रज्ञान, चिकित्सक विचारसरणी, ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, प्रोग्रामिंग कौशल्ये याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असेही डॉ. रवंदळे यांनी सांगितले.

पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे यांनी अभियांत्रिकीच्या चौथ्या बॅचचे स्वागत केले. येथील उद्योगाभिमुख शिक्षण, आंतरराष्ट्रीय सहकार्य, परदेशी भाषा शिक्षण आणि लवकरच सुरू होणाऱ्या सेंटर ऑफ एक्सलन्सची माहिती दिली. पीसीयू मधील अत्याधुनिक प्रयोगशाळा, रोबोटिक्स, सेमी कंडक्टर तंत्रज्ञान, उद्योग सहकार्य, परदेशी भाषा शिक्षण, वसतिगृह व क्रीडा सुविधा, महिंद्रा आणि जपान, दक्षिण कोरिया येथील अनेक उद्योगांशी असलेल्या भागीदारीचा विद्यार्थ्यांना उपयोग होईल असे सांगितले. डॉ. रामदास बिरादार पीसीईटीची शैक्षणिक परंपरा, अत्याधुनिक पायाभूत सुविधा, अनुभवी प्राध्यापक, संशोधनाच्या संधी आणि मजबूत प्लेसमेंट व्यवस्था यांची माहिती दिली.

# डी. वाय. पाटील औषधनिर्माण महाविद्यालयाला 'ए' श्रेणीचे मानांकन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास "'क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडिया (QCI)" अंतर्गत कार्यरत राष्ट्रीय शिक्षण व प्रशिक्षण मान्यता मंडळ (NABET) तर्फे २०२५-२६ या वर्षासाठीच्या देशांतर्गत महाविद्यालयांच्या गुणवत्तामापन व क्रमांकन मूल्यांकन प्रक्रियेत महाविद्यालयास मानाचे 'A' श्रेणीचे मानांकन प्राप्त झाले आहे.**




क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडिया (QCI) ही भारत सरकार आणि भारतीय उद्योग क्षेत्राच्या संयुक्त पुढाकारातून स्थापन झालेली, विविध क्षेत्रांमध्ये गुणवत्ता संवर्धन, गुणवत्ता आश्वासन, मानकीकरण आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणारी राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च मान्यता प्रदान करणारी संस्था आहे. NABET (एनएबीईटी) मार्फत शैक्षणिक संस्थांचे विविध ११ गुणवत्ताविषयक निकषांवर मूल्यमापन करून त्यांना मानांकन प्रदान केले जाते.

एनबीए,नॅक च्या उत्कृष्ट श्रेणी मिळवल्यानंतर या देशव्यापी मानांकनांच्या प्रथम वर्षीच "ए"श्रेणी मिळाल्यामुळे महाविद्यालयाच्या अष्टपैलू प्रगतीवर एक प्रकारचे शिक्कामोर्तब झाले आहे.या महत्त्वपूर्ण यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे म्हणाले, "हे मानांकन महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येणाऱ्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवोपक्रम, कौशल्यविकास आणि सर्वांगीण विद्यार्थी विकासासाठी असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची व दृढ बांधिलकीची साक्ष आहे.

या मानांकनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक उत्कृष्टतेला आणि गुणवत्ता संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून त्यामुळे महाविद्यालयाच्या सर्व घटकांचा आनंद व आत्मविश्वास वाढला आहे.या मानांकन प्राप्तीनिमित्त संकुल संचालक रीअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त) यांनी महाविद्यालयातील सर्व अंतर्गत व बाह्य भागधारकांचे अभिनंदन केले. संस्थेचे विश्वस्त श्री तेजस पाटील यांनी विद्यार्थी-केंद्रित शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम यांवर भर देणाऱ्या उपक्रमांसाठी तर उपाध्यक्ष श्री सतेज पाटील यांनी सातत्यपूर्ण कामगिरीचे विशेष कौतुक केले व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात..!